दै. मराठवाडा नेता. दि. 21/01/2025

# भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत लुटमार करणाऱ्या
# पाच गुन्हेगारांना पकडण्यात गुन्हे शोध पथकाला यश



**नांदेड : (म नेता)**

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत लुटमार करणार्या पाच जणांना गुन्हे शोध पथकाने जेरबंद केले असून त्यांच्याकडून रोख रक्कम व सोन्याची अंगठी जप्त केली आहे. दरम्यान सदरील पाच आरोपींपैकी दोन आरोपी हे अल्पवयीन आहेत.

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून रस्त्यात अडवून शस्त्रांचा धाक दाखवून व मारहाण करुन सामन्या नागरीकाची लुट करण्यात येत होती. दोन दिवसांपूर्वी यशवंतनगर येथील हनुमान मंदिरात दर्शनासाठी आलेल्या नागडा यांचा गळा आवळून त्यांच्या हातातील अंगठी काढून घेतली होती. तसेच एकास मारहाण करुन त्यांचा मोबाईल व रोख रक्कम पळविली होती. भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे पोलिस उपनिरीक्षक विनोद देशमुख व तयांचे सहकारी गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की, सदरील घटनेतील आरोपी हे जिरायत मैदान येथे आरोपी असल्याची माहिती मिळाली. पोलिस उपनिरीक्षक विनोद देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी धाड टाकून आरोपी शुभम आनंद राठोड, अभय नारायण कांबळे, आर्यन राहुल परांडे व इतर अल्पवयीन दोन अशा पाच आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन गुन्ह्यांची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून यशवंतनगर चोरीच्या गुन्ह्यातील रोख रक्कम व सोन्याची अंगठी जप्त केली आहे. तसेच दुसर्या गुन्ह्यातील रोख रक्कम जप्त करुन त्यांना ताब्यात घेतले आहे. सदरील आरोपींना पोलिस ठाण्यात आणून आणखीन गुन्हे केले काय यांची खातरजमा करण्यात येत आहे. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रामदास शेंडगे, गुन्हे शोध पथकाचे पोलिस उपनिरीक्षक विनोद देशमुख व पोलिस कर्मचारी प्रदिप गर्दनमारे, वडियार, मुंडे, किडे, माळवे यांच्यासह इतर कर्मचार्यांनी हि कारवाई पार पाडली आहे.